# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/03/2023 (शुक्रवार) सकाळ

---

### चालक पोलीस शिपाई लेखी परीक्षेबाबत सुचना

नागपूर जिल्हा ग्रामीण चालक पोलीस शिपाई पदाकरीता सुरू असलेल्या पोलीस भरती –२०२१ च्या लेखी परीक्षाकरीता मा. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. प्रशि/पोशि भरती/पो २०२१/१३२/२०२०/८०७ दिनांक २८/०२/२०२३ च्या पत्राअन्वये जे उमेदवार शारीरिक चाचणी व कौशल्य चाचणीमध्ये विहीत गुणांनी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक २६/०३/२०२३ रोजी **तुळशीराम गायकवाड पाटील, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मोहगाव जिल्हा नागपूर येथे** घेण्यात येणार आहे. उमेदवारांनी लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागा मार्फत ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहे. सदर परीक्षा केंद्रावर उमेदवारांनी ६.३० वा. पोहोचणे आवश्यक आहे. याबाबत पात्र उमेदवारांची यादी नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे संकेत स्थळावर **nagpurgraminpolice.gov.in उपलब्ध आहे.**

### जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत ०२ कि. मी अंतरावरील चकोले कंस्ट्रक्शन चे समोर शनिवारी वार्ड रामटेक येथे दिनांक २२/०३/२०२३ चे १६.०० ते १६.३० वा. चे दरम्यान आरोपी नामे– भगवान कावळे वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष रा. शनिवारी वार्ड रामटेक जि. नागपूर हा फिर्यादी नामे– श्रीराम महादेव भुते, वय ६३ वर्ष, रा. शनिवारी वार्ड रामटेक जि. नागपूर याच्या मुलासोबत वादविवाद करत असता फिर्यादी हा तेथे आला व ‘‘तु माझे मुलासोबत वादविवाद कशाला करते.’’ असे म्हणुन हटकले असता आरोपीने फिर्यादीला ‘‘तु आमचे मधात बोलु नको’’असे म्हणुन शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली आणि त्याचे हातात असलेल्या लोखंडी टु व्हिलर गाडीचा शॉकपचा रॉडने फिर्यादीच्या मुलाचे डोक्यावर ३ ते ४ वेळा मारून गंभीर जख्मी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला होता. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. संजय खोब्रागडे मो. नं. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर